REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 6 | MARCH - 2022

# नरहर कुरुंदकर : कोषाबाहेर न पडलेले विचारवंत

डॉ. प्रकाश घ. कांबळे
कला,वाणिज्य व गृहविज्ञान महिला महाविद्यालय,जळगाव.

**प्रस्तावना –**



नरहर कुरुंदकर हे मराठी विचारविश्वातील महत्त्वपूर्ण असे नाव राहिलेले आहे.एक समाजचिंतक, प्रभावी वक्ते असण्याबरोबरच ते सिद्धहस्त असे लेखकही होते. साहित्य, समाज आणि संस्कृती बरोबरच धर्म, राजकारण आणि इतिहास हेही कुरुंदकर यांच्या मूलगामी चिंतनाचे विषय होते. आंबेडकरी विचार आणि आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ यासंदर्भात कुरुंदकर यांनी फुटकळ असे लेखन केलेले आहे. १९६९ साली प्रकाशित झालेल्या 'भजन' या लेखसंग्रहामध्ये त्यांनी चळवळीचा वेध घेऊन बौद्ध धम्म, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि आंबेडकरी समाज या विषयी काही प्रशन उपस्थित केलेले आहेत. कुरुंदकरांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचा आणि त्यांच्या भूमिकेचा शोध घेणे हा या शोधनिबंधाचा प्रमुख उद्देश्य आहे.

नरहर कुरुंदकर यांच्या लेखनाचा पट विस्तृत म्हणावा असा आहे. त्यांच्या लेखनासंदर्भात आणि बौद्धिकते संदर्भात मराठी विचारविश्वामध्ये एक प्रकारचे आकर्षण होते किंवा त्यांच्यावर प्रेम करणारांनी त्यांच्यासंदर्भात जाणीवपूर्वक आकर्षण निर्माण केले असे म्हटले तरी चालेल.कुरुंदकर यांचे लेखन हे बौद्धिक असते ही बाब जरी असली तरी त्यांच्या लेखनात कोणत्याही संदर्भ नोंदी नसतात,हे वास्तव मात्र नाकारता येत नाही.दुसरे म्हणजे म्हणजे कुरुंदकरांची ओळख पुरोगामी विचारवंत अशी असली तरी ही ओळखही तथ्याच्या कसोटीवर न टिकणारी अशीच कारण त्यांचा प्रभा नावाच्या मुलीशी प्रेमविवाह असूनही त्यांनी आपला विवाह वैदिक पद्धतीनेच केला. स्वतःच्या श्यामला नावाच्या मुलीचा विवाह जमीनदारी थाटाने केला तर विश्वास या मुलाची मुंज व मौजीबंधन साग्रसंगीतपणे केले आणि श्रेष्ठत्वाचे प्रतिक असलेले जाणवे तर ते शेवटपर्यंत घालत होते.मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या वेळीही त्यांनी जाणीवपूर्वक नामांतर विरोधी भूमिका घेतली.मात्र आश्चर्याची गोष्ट अशी की या सर्व गोष्टीचे त्यांनी जाहीरपणाने समर्थन केले ज्यामुळे कुरुंदकर यांच्यावर प्रेम करणाराचाही गोची झाली.ती व्यक्त करतांना विनोद शिरसाठ म्हणतात,' कुरुंदकरांचा स्वभाव लक्षात घेता घरातील मंगलकार्य टाळणे शक्य नव्हते.पण त्यातील कर्मकांडात कमीतकमी सहभाग घेतला असता आणि नंतर त्याचे कसलेही समर्थन न करता 'करतो आहे ते चूक आहे मात्र,माणसं सांभाळण्यासाठी हे करणे भाग आहे.' अशी भूमिका घेतली असती तर बरे झाले असते.'[१] उक्ती आणि कृतीत कमालीचे अंतर ठेवल्यामुळे कुरुंदकर यांना लावल्या जात असलेल्या'पुरोगामी'या विशेषणाला कसलाही अर्थ उरत नाही. हे

जसे कृतीसंदर्भात आहे तसेच त्यांनी मुस्लीम प्रश्नासंदर्भात घेतलेली भूमिकाही प्रतीगामीच आहे. मात्र प्रस्तुत निबंधाचा विषय नसल्यामुळे त्याच्या तपशिलात मी जात नाही. नरहर कुरुंदकर यांनी मनुस्मृतीची चिकित्सा करणारा छोटासा ग्रंथ लिहिला आहे. अर्थात ते त्यांच्या या ग्रंथात मनुस्मृतीचे समर्थन करत नाहीत,नव्हे; डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या मनुस्मृतीच्या दहनाचे ते समर्थन करतात. हे खरे असले तरी हा संपूर्ण ग्रंथ 'बिटवीन द लाईन' वाचला तर मनुस्मृतीच्या दहानामुळे कुरुंदकर दुखावले गेलेले आहेत हे जाणवल्याशिवाय राहत नाही. आपली वेदना फार चलाखीने नोंदवताना ते म्हणतात,'प्राचीन ग्रंथ जाळून नष्ट करणे व ज्ञानसाधना नष्ट करणे हा रानटीपणा बाबासाहेबांना मान्य नव्हता.किंवा याच ग्रंथात ते म्हणतात ,'एक ग्रंथ जाळला म्हणून तो पृथ्वीतलावरूनच नष्ट होतो असे नाही.'[२] आड्वळनाणे ते बाबासाहेबांना रानटी हेही विशेषण लावत आहेत. दुसरे म्हणजे,'आंबेडकरांचे खरे भांडण इतिहासाशी नव्हते.दिड हजार वर्ष तुम्ही आम्हाला गुलाम केले, अन्यायाने आमच्यावर अपमानित जीवन जगण्याची पाळी आणली. ह्या मुद्य्यावर त्यांचे खरे भांडण नव्हते.हिंदू धर्माला विशेष दोषी धरण्याची आंबेडकरांची इच्छा नव्हती.ते हिंदू संस्कृतीचे अभिमानी होते. प्रश्न इतिहासाचा नसून वर्तमानाचा होता.'[३] कुरुंदकर यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा थेट विरोध न करता त्यांना ब्राह्मणांच्याच छावणीत उभे केले आहे.प्रश्न इतिहासाचाही होता आणि वर्तमान काळाचाही आहे. जर तसे नसते तर बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या संपूर्ण लेखनात भारताच्या इतिहासाचे उत्खनन कशाला केले असते? बाबासाहेबांचे एकूण लेखन/भाषण/आणि आंदोलन पहिले तर हिंदू धर्माला त्यांनी सतत कोर्टाच्या कटघर्यात उभा केलेले आहे. बाबासाहेबांना हिंदू धर्माचे सहानुभूतीदार आणि त्यांचे इतिहासाशी वैर नव्हते अशी मांडणी करून नरहर कुरुंदकर यांनी बाबासाहेबांनी आरंभिलेल्या महान संघर्षाला अतिशय सामान्य पातळीवर आणून सोडण्याचा द्रोह केलेला आहे.त्यांच्या संपूर्ण लेखनात बाबासाहेबांना दलिताचे नेते असे संबोधन त्यांनी वापरलेले आहे जेकी संविधानविरोधी आहे.ज्या महाडच्या चौदार तळ्यावरील सत्याग्रहाने देशभरातील अस्पृश्यांमध्ये चेतना निर्माण झाली आणि आजही मानवतेचा महान संगर म्हणून जगभरातील शोषित/वंचित लोकांना हा संगर प्रेरणा देत आहे त्या संगरासंदर्भातही कुरुंदकर यांनी वेगळाच सूर लावला आहे.तो असा ,'१९२७ पुरता विचार केला तर महाड हे यशस्वी माघार झालेले अयशस्वी प्रकरण दिसू लागते.'[४] इतकेच नव्हे तर 'महाडच्या आंदोलनाची जी मांडणी केलेली आहे ती पूर्णतः इतिहासाची मोडतोड तर आहेच पण जनतेची दिशाभूल करणारी देखील आहे.'[५] कुरुंदरांसारखा विचारवंत हे सर्व अजाणतेपणी करत आहे असे कसे म्हणावे? कुरुंदकरांचे हे रूप पहा..'वर्णव्यवस्था,जातीव्यवस्था ब्राह्मणांनी निर्माण केली असे मात्र नाही.अशाप्रकारची समाजव्यवस्था निर्माण करण्याचे,टिकवण्याचे सामर्थ्य ब्राह्मणाजवळ कधीच नव्हते.राज्य,शस्त्र व सत्ता त्यांच्या हाती नव्हती.'[६] इतका धादांत खोटेपणा विचारवंत या संज्ञेला शोभत नाही.ब्राह्मणांनीच पहिल्यांदा वर्ग बंदिस्त करून जाती निर्माण केल्या हे स्वतः डॉ .बाबासाहेबांसह अनेक विचारवंतानी साधार सिद्ध केलेले आहे. यासंदर्भात बाबासाहेब म्हणतात,'भारताचा इतिहास इतर काही नसून आर्य आणि नाग यांच्या संघर्षाचा आहे. नाग इथले आर्य घोड्यावरून आले म्हणून ते नागांना पराभूत करू शकले. कारण त्यांचे शस्त्र प्रगत होते.इथल्या नागांना पराभूत करून आर्यांनी त्यांच्यावर विजय मिळविला आणि स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित केले.त्यांनी वर्णव्यवस्था कार्यरत केली व आम्हाला गुलाम केले.'[७] हे वास्तव असतानाही कुरुंदकर ब्राह्मणांना क्लीनचीट का देत आहेत? कारण स्पष्ट आहे ते असे की स्वतः कुरुंदकरांना आपण ब्राह्मण असल्याचे विसरता आलेले नाही. म्हणून स्वतः सह आपल्या जातीवरील पातक धुवून काढण्यासाठी ते प्रयत्नाची पराकाष्ठा करतांना दिसतात.त्यांच्या संपूर्ण लेखनात हे प्रयत्न विखुरलेले आहेत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर ही जागतिक पातळीवरील केवळ अभूतपूर्व अशी घटनाच नव्हे; तर ती महान क्रांती होती.म्हणून तर त्यावर जागतिक पडसाद उमटले.म.गांधी पासून सामान्य व्यक्तीपर्यंत अनेकांनी या धर्मांतराचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केलेला आहे.आजही हा प्रयत्न चालूच आहे.नरहर कुरुंदकर यांनीही हा प्रयत्न केला आहे.ते स्वतःला कितीही पुरोगामी म्हणत असले तरी त्यांना ब्राह्मन्त्वातून बाहेर पडता आलेले नाही याची साक्ष देणारे अनेक उतारे त्यांच्या लेखनातून दाखवता येतील. इतर कर्मठ ब्राह्मणांपेक्षा कुरुंदकर कुठल्याही अर्थाने वेगळे वाटत नाहीत.बौद्ध धर्मासंदर्भात ते म्हणतात," भारतात एके काळीबौद्ध धर्म वैभवाच्या शिखरावर होता.ह्या बौद्ध धर्माच्या प्रभावाने हिंदू समाजाचे सारे मानसिक जीवन संस्कारित केले आहे. हा बौद्ध प्रभाव इतका खोल आणि सर्वांगीण आहे की,आजचा हिंदू धर्म हे बौद्ध धर्माचेच एक परिणत रूप आहे असे म्हटले तर त्यात फारशी अतिशयोक्ति होणार नाही."[८] कुरुंदकर हिंदुत्त्ववादी सावरकरांपेक्षा वेगळे काय म्हणत आहेत.तर्कतीर्थ म्हणवणाऱ्या लक्ष्मणशास्त्री जोशी यांनीही असेच म्हटले आहे. बौद्ध धर्म ही हिंदू धर्माचीच शाखा आहे असे कर्मठ हिंदुत्त्ववाद्याव्यतिरिक्त इतर कोणाचे मत नाही हे यानिमित्ताने लक्षात घेणे आवश्यक आहे.या कर्मठ हिंदुत्त्वावाद्यांचा समाचार घेतांना बाबासाहेब म्हणतात,"बौद्ध धर्म ही हिंदू धर्माची एक शाखा आहे,अशा मताचा प्रचार अलीकडे फारच बोकाळला आहे.वस्तुतः बौद्ध प्रणीत धर्म समकालीन होता तो वैदिक अथवा ब्राह्मणी धर्माहून अतिशय भिन्न होता.वैदिक वेद ग्रंथाना प्रमाण मानीत तर बुद्धाचा त्यांना विरोध होता.कालामसूक्ता मध्ये बुद्धाने माणसाला विचारस्वातंत्र्य असले पाहिजे आणि वेदांनी माणसांसाठी सदासर्वकाळ टिकणारा विचार करून ठेवला नाही असे प्रतिपादले आहे.बुद्धाच्या वेदप्रामाण्यावरील आघाताचा पुढील काळात हिंदुच्याभगवद्गीतेसारख्या ग्रंथावरही परिणाम झालेला आहे."[९] बौद्ध विचारला प्रेरणास्थान मानून किंवा बुद्धाच्या सामाजिक क्रांतीमुळे उदयास आलेली सम्राट मोर्य घराण्याची राजवट साडेबाराशे वर्ष चाललेली आहे.जर या दोन धर्मात इतके साधर्म्य होते तर बौद्ध धर्माचा नाश करण्यासाठी प्रतिक्रांतीची गरज का निर्माण झाली हे कुरुंदकर सांगत नाहीत.शेवटचा मौर्य सम्राट याची पुष्यमित्र शुंग नावाच्या सेनापतीने हत्या करून स्वतःची राजवट प्रस्थापित करून वैदिक धर्माची प्रस्थापना केली हा इतिहास आहे.मात्र या सत्याकडे दुर्लक्ष करत केवळ हेच नाही तर बौद्ध धर्मासंदर्भात कुरुंदकर यांनी अनेक असत्य विधाने केली आहेत.अगदी त्याचप्रमाणे डॉ.बाबासाहेब आणि म.गांधी यांच्यामध्ये झालेल्या प्रसिद्ध अशा पुणे कराराचाही चुकीचा अन्वयार्थ लावलेला आहे.काहीठिकाणी तर त्यांनी अतिशय हस्यास्पद विधाने केली आहेत.नमुना म्हणून हे विधान पाहायला हरकत नाही."एक माणूस वाचविण्यासाठी कोट्यावधी दलितांचे हक्क बाबासाहेबांनी सोडून का दिले?"[१०]. कुरुंदकरांच्या या प्रश्नाला केवळ हस्यास्पद म्हणून सोडून देता येणार नाही कारण त्यांना जे काही म्हणायचे असते ते कधीच सरळपणे म्हणत नाहीत.म्हणून अशा प्रकारचे विधान करून सर्वसामान्य जनतेत संभ्रम निर्माण करण्याचा उद्देश्य नसेल असे म्हणता येणार नाही.डॉ,बाबासाहेब आंबेडकर यांनी म.गांधीचे नव्हे तर कोट्यावधी दलितांचे कोट्यावधी शोषित/वंचितांचे प्राण वाचविण्यासाठी प्रस्तुत करारावर स्वाक्षरी केलेली आहे.सर्वप्रकारचे प्रयत्न करूनही डॉ.आंबेडकर बधत नाहीत हे गांधी समर्थकांच्या लक्षात आल्यानंतर अस्पृश्य दलितांची घरे जाळून टाकण्याच्या धमक्या यायला लागल्या तेव्हा डॉ.बाबासाहेबांनी दोन पाऊले मागे येणे स्वीकारत पुणे करारावर स्वाक्षरी केली हा इतिहास आहे. तो कुरुंदकर यांना माहित नाही असे कसे म्हणावे?डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नेतृत्त्व हे राष्ट्रव्यापी होते. असे असूनही तत्कालीन आणि आजही स्वतःला पुरोगामी म्हणवणारे असंख्य अभ्यासक बाबासाहेबांना मर्यादित करण्याचा प्रयत्न करत आलेले आहेत.या मध्ये कुरुंदकरही मागे नाहीत.फक्त त्यांची म्हणायची पद्धत वेगळी आहे,कशी ती पहा.."बाबासाहेबसुद्धा महान राजकीय नेते होते, तरी शेवटी ते एक माणूस होते. त्यांना सुद्धा सर्व दलित समाज एका संघटनेत आणता आला नाही.महारष्ट्राबाहेरील अस्पृश्य वर्गात त्यांना फार

मोठा पाठींबा मिळविता आलेला नाही."[११] मात्र वस्तुस्थिती खरेच अशी होती का?तर अजिबात तसे नव्हते.कारण डॉ.बाबासाहेब आंबेडकर घटना परिषदेवर पश्चिम बंगालमधून नमोशुद्र जातीच्या लोकामधून निवडून आले होते.त्यांच्या हयातीत शे.का.फे.पक्ष मद्रास, पंजाब, उत्तरप्रदेश आणि गुजरातच्या काही भागात मूळ धरून होता.बाबासाहेबांच्या चळवळीत मातंग समाज,चांभार समाज कमी प्रमाणात असेल मात्र तो होता.हे सारे संदर्भ कुरुंदकर नजरेआड करत आहेत."[१२] जातिव्यवस्थेला धोका निर्माण करणाऱ्या चळवळीचा शोध घेतांना सुप्रसिद्ध विचारवंत डॉ.आनंद तेलतुंबडे म्हणतात,"जातीपद्धातीला धोके निर्माण करणारे व तिच्याविरुद्ध उघड बंड करणारे संघर्ष गेल्या शतकाच्या सुरुवातीपासून सुरु झाले.हे संघर्ष म.फुले यांची सत्यशोधक चळवळ,पूर्वीच्या मद्रास प्रांतातील पेरियार रामास्वामी नायकर यांची अब्राह्मणी चळवळ आणि बाबासाहेब आंबेडकर यांची दलित चळवळ जिचा सर्वत्र भारतात विस्तार झाला."[१३] १९२४ साली बहिष्कृत हितकारिणी सभेसारख्या छोट्याशा मंचावरून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या राजकीय/सामाजिक/राजकीय जीवनाची सुरुवात करून घटना परिषदेसारख्या राष्ट्रीय आणि बौद्ध धम्म स्वीकारून आपला मंच आंतरराष्ट्रीय मंचापर्यंत व्यापक केलेला आहे.राष्ट्रीय पातळीवरून लोकांचे समर्थन मिळाल्याशिवाय बाबासाहेब विराट झालेले आहेत का?संपूर्ण राष्ट्राचे उत्थान हे बाबासाहेबांचे जीवनध्येय होते.बाबासाहेबांचा मुख्य संघर्ष जो झालेला आहे तो म.गांधी यांच्याशी झालेला आहे.बाबासाहेब केवळ एक जातीचे नेते असते तर म.गांधी सारख्या राष्ट्रीय नेत्याला बाबासाहेबांशी मुख्य संघर्ष करण्याचे काय कारण?बाबासाहेबांच्या निर्वाण पश्चात मान्य.कांशीराम आंबेडकरी विचाराच्या माध्यमातूनच राष्ट्रीय राजकारणात यशस्वी झालेले आहेत.इतकेच नव्हे;तर आज संपूर्ण जगामध्ये जिथे जिथे म्हणून शोषित/वंचित आहेत त्या सर्वांसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विचार मुक्तिदायी विचार झालेला आहे/होतो आहे. कुरुंदकर वास्तवाकडे दुर्लक्ष का करताहेत? कारण स्पष्ट आहे की,बाबासाहेबांच्या राष्ट्रीय नेतृत्त्वाला विशिष्ट अशा चौकटीत बंदिस्त करून एका जातीत बंदिस्त करणे याचे फार मोठे षडयंत्र आपल्याकडे चालले आहे.त्याचाच एक भाग म्हणून कुरुंदकर यांच्या उपरोक्त भूमिकेकडे पाहावे लागते.नरहर कुरुंदकर यांनी आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ आणि आंबेडकरी समूहाच्या वर्तनालाही प्रश्नांकित केलेले आहे.दलितांच्या वर्तनावर प्रश्न उपस्थित करतांना ते म्हणतात,"अस्पृशांचा दुसरा प्रश्न कायद्याने समानता मिळाली तरी सवर्ण हिंदू समाजाने त्यांना मनाने समान मानले नाही हा आहे.असे सांगून त्याच्या सोडवणुकीसाठी सवर्ण हिंदू समाजाने मनाने आपणाला समान म्हणून स्वीकारणे यासाठी केवळ झगडा पुरत नसतो,त्यासाठी काही सौजन्य,कृतज्ञता याचीही गरज लागते.''[१४] कुरुंदकरांची ही भूमिका केवळ भयंकर म्हणावी अशीच आहे.मुळात अस्पृश्यता ही संविधानाच्या अंमलबजावणी नंतर संपलेली असतांनाही कुरुंदकर'अस्पृश्यता' या शब्दाचा पुन्हा-पुन्हा वापरताहेत त्यातून त्यांना काय अभिप्रेत आहे? दुसरे म्हणजे दलित समूहाने सवर्णांप्रती काय म्हणून कृतज्ञता व्यक्त करावी?शेकडो वर्ष अस्पृश्य म्हणून वागवले म्हणून?मन-मशतीषक व मनगट गुलाम केले म्हणून?पाटिला खराटा आणि गळ्यात गाडगे बांधले म्हणून? की आणखी कशासाठी दलितांनी सवर्णांप्रती कृतज्ञता व सौजन्यता बाळगायला हवी हे कुरुंदकर स्पष्ट करत नाहीत. पुढे ते जे म्हणताहेत ते केवळ भयंकर असेच आहे."शेवटी दलितांना दलित म्हणून उरावयाचे आहे की आपले दलितपण संपवायचे आहे?अस्पृश्यता टिकवायची आहे की संपवायची आहे?"[१५] ही अस्पृश्यता.दलितपण कोणी लादले आहे?यातून दलितांना प्रचंड फायदा मिळतो आहे का?यातून सर्वस्वी बाहेर पडणे त्यांच्याच हातात आहे का?" घेट्टो सारख्या वस्तीत अस्पृश्याचे जिणे जगणाऱ्या दलितांना समतेने, बंधुभावाने व माणुसकीने वागवावे असा स्पृश्य समाजाला सल्ला देण्याऐवजी हा विचारवंत अस्पृश्यतेच्या व दारिद्र्याच्या बेड्यांनी जखडून जराजर्जर झालेल्या दलितांनाच कोषाबाहेर पडायला सांगतो आहे.जणू काही या जातीधर्माच्या बेड्या दलितांनी स्वतःहून आपल्या हातापायात अडकवलेल्या आहेत."[१६] खरेतर दलित

राहण्यात कोणालाच आनंद वाटत नसतो.नव्हे; संधी मिळताच ते झुगारून देण्यातच तो खरा आनंद मानत असतो.भारतीय दलितांनी त्या मोठ्या प्रमाणात झुगारूनही दिलेल्या आहेत.विचारवंताने शोषितांच्या बाजूने उभा राहून त्यांच्या मनामध्ये उर्जस्वल विचार पेरण्याचे व शोषकाच्य विरोधात आवाज बुलंद करायचे काम करायचे असते.एकवेळ त्याने वंचिताचा पक्षपाती असले तरी हरकत नाही.कार्ल मार्क्स म्हणाले होते,"जगभरातल्या कामगारानो भांडवलशाहीच्या विरोधात एक व्हा!आणि स्वतःला समाजवादी/व मार्क्सवादी विचारवंत म्हणवून घेणारे कुरुंदकर मात्र दलितांना सवर्णांशी सौजन्याने,कृतज्ञतेने वागण्याचा व कोषातून बाहेर पडण्याचा सल्ला देताहेत?ज्यांना आयुष्यभर गळ्यातून जाणावे काढता आले नाही.आपल्या मुलांची मुंज टाळू शकले नाहीत.ब्राह्मण असण्याचे सर्व प्रिव्हिलेज घेतले इतकेच नव्हे;तर जातिव्यवस्थेचे निर्माते आर्य नाहीत हे पटवून देण्यासाठी जीवाचा आटापिटा केला आणि स्वतःलाही डीकास्त करू शकले नाहीत.तरीही कुरुंदकर स्वत;ला आयुष्यभर पुरोगामी म्हणवून घेत राहिले आणि त्यांच्या मित्र-परिवाराने त्यांची तशी पोकळ पत्राज वाढवली जी आजतागायत कायम आहे.मात्र त्यांचे सर्व लेखन चिकित्सक व बिट्वीनद लाईन अभ्यासल्या नंतर कुरुंदकर हे कोषाबाहेर न पडलेले विचारवंत आहेत असा स्पष्ट निर्वाळा देण्याशिवाय पर्याय उरत नाही.

## संदर्भ:


१. शिरसाठ विनोद,निवडक नरहर कुरुंदकर,देशमुख आणि कंपनी प्रा.लि.पुणे,प्र.आ.२०१३,पृ.२९३

२. कुरुंदकर नरहर,मनुस्मृती,देशमुख आणि कं,पुणे,आ. पृ.क्र. ६९

३. तत्रैव,पृ.क्र.७६

४. खरात विलास, शिव-फुले-शाहू-आंबेडकर विरोधी नरहर कुरुंदकरांच्या भूमिकेची चिकित्सा,मूलनिवासी पब्लिकेशन,पुणे,१५ जाने.२०२२,उधृत पृ.क्र.७५

५. तत्रैव,पृ.क्र.७५

६. उनि,कुरुंदकर,पृ.क्र.१६५

७. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे,भाग ३, पृ.क्र.२५७(१९४८-१९५७)

८. कुरुंदकर नरहर,आकलन, पृ.क्र.९२

९. उनि,.खरात विलास,पृ.क्र.१९२ वरून उधृत

१०. कुरुंदकर नरहर,भजन,इंद्रायणी प्रकाशन,पुणे,पृ.क्र.२५

११. तत्रैव,पृ.क्र.३०

१२. मोगले प्रकाश,लोकरंग पुरवणी,२१ एप्रिल २०१३,पृ.क्र.०४

१३. तेलतुंबडे आनंद,सामाराज्य्वाद आणि जातिविनाश,सुगावा प्रकाशन,पुणे,पृ.क्र.७२

१४. कुरुंदकर नरहर,भजन,इंद्रायणी प्रकाशन,पुणे,पृ.क्र.७३

१५. तत्रैव,पृ.क्र.७४

१६. उनि,मोगले प्रकाश,पृ.क्र.०४